

**लोणावळा :** व्हिपीएस इंजिनिअरिंग कॉलेज, वाकसई लोणावळा येथे 19 फेब्रुवारी रोजी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मानव अ. ठाकूर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. ठाकूर यांच्या हस्ते “छत्रपती शिवाजी महाराज” यांच्या मुर्तीचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर महाविदयालयाच्या विद्यार्थ्यांनी खूप चांगल्या प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले तसेच पोवाडे सादर केले. आणि प्रथम वर्ष इंजिनिअरींगच्या विदयार्थ्यांनी लेझीम सादर करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्याचे बहुमोल सहकार्य लाभले.